PARLE MAHOTSAV

Organiser - ADV. PARAG ALAVANI, President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE MAHOTSAV

दि. २५.११.२०१३

**कृपया प्रसिद्धीकरिता**

# सलग चौदाव्या वर्षी पार्ले महोत्सवचे भव्य आयोजन

## ३८ प्रकारच्या स्पर्धांमध्ये बहाल होतील 2000 बक्षिसे

मुंबईः संपूर्ण मुंबईकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभणारा “पार्ले महोत्सव” २१ डिसेंबर ते ३० डिसेंबर असे दहा दिवस आयोजित केला जात असून यंदा ह्या स्पर्धेचे सलग चौदावे वर्ष आहे. विविध स्पर्धांचे आयोजन असणाऱ्या १४व्या पार्लेमहोत्सवामध्ये ३८ प्रकारच्या कला व क्रीडा स्पर्धा होणार असून ४०० प्रथम पारितोषिकांसह सुमारे २०००बक्षिसे प्रदान करण्यात येणार आहेत. तान्ह्या बाळापासून ते ज्येष्ठ नागरीकांपर्यंत सहभागी होऊ शकणाऱ्या स्पर्धा या महोत्सवात असून सर्वांनी मोठ्या संख्येने भाग घ्यावा असे आवाहन महोत्सवाचे प्रमुख आयोजक अॅड. पराग अळवणी यांनी केले आहे.

मागील १३ वर्षांमध्ये पार्ले महोत्सवास पार्लेकरांचा व पार्ल्याबाहेरील हजारो लोकांचा प्रतिसाद लाभत असून आतापर्यंत सुमारे आठ हजार स्पर्धकांना बक्षिसे मिळाली आहेत. महोत्सवामध्ये भाग घेणाऱ्या काही लाख स्पर्धकांनी आतापर्यंत प्रशस्तिपत्रक मिळवले आहे. मुलांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळण्यासाठीच हे व्यासपीठ असून अनेक कलावंत-क्रीडापटूंना अशा स्पर्धांमुळे आपल्या करीयरसाठीचे क्षेत्र या निमित्ताने निवडता येते, असे अॅड. पराग अळवणी यांनी सांगितले.

१४व्या पार्ले महोत्सवामध्ये कला, सांस्कृतिक, मैदानी खेळ, इनडोअर गेम्स तसेच वैशिष्ट्यपूर्ण स्पर्धा अशा पाच विभागामध्ये स्पर्धा होणार आहेत. सर्वात जास्त स्पर्धकांचा सहभाग असणारी मॅरेथॉन दि. २२ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता होणार असून कला विभागात चित्रकला, व्यंगचित्र, मेहेंदी, रांगोळी स्पर्धा; सांस्कृतिक विभागात स्वरचित काव्यवाचन स्पर्धा, अंताक्षरी, नृत्य, ड्युएट डान्स, समूह नृत्य, मराठी गायन, हिंदी गायन, एकपात्री प्रयोग, वक्तृत्व स्पर्धा; मैदानी खेळामध्ये फुटबॉल, बॉक्स क्रिकेट, ओवरआर्म क्रिकेट, कबड्डी, हॉलीबॉल, थ्रोबॉल, खोखो, मल्लखांब, योगा, शरीरसौष्ठव, ५० मीटर धावणे, गोळाफेक, रस्सीखेच, तर इनडोअर गेम विभागात कॅरम, बुद्धिबळ, टेबलटेनिस, बॅटमिंटन, रायफल शुटींग तर वैशिष्ट्यपूर्ण विभागामध्ये महिलांसाठी होममिनिस्टर, ज्येष्ठ नागरीक, सुदृढ बालक, भारत को जानो प्रश्नोत्तर स्पर्धा अशा स्पर्धांचे आयोजन होणार आहे. अधिक माहितीसाठी www.parlemahotsav.com संकेतस्थळावर किंवा भाजप कार्यालय, चित्तरंजन रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई - ४०००५७ किंवा २६१३६५१३ येथे संपर्क साधावा असे आवाहन पार्ले महोत्सव आयोजन समितीकडून करण्यात आले आहे.

---

सदर पत्रक श्रीकृष्ण आंबेकर, कार्यालय प्रमुख, पार्ले महोत्सव यांनी प्रसिद्ध केले आहे.